RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक १०] मंगळवार, फेब्रुवारी १७, २०२६/माघ २८, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक १४

प्राधिकृत प्रकाशन

उपविभागीय अधिकारी, ठाणे उपविभाग, ठाणे यांजकडून

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक एलएक्युएसआर-६८/२०२३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या (सन १९६६ चा महाराष्ट्र ३७) (यापुढे "उक्त नगररचना अधिनियम, १९६६" म्हणुन संबोधिलेला) च्या कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये ठाणे महानगरपालिकेची सुधारीत विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेला) अधिसूचना क्र. टीपीएस-१२९७/१३१९/प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ०४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजुर झाली असुन, ती दिनांक २२ नोव्हेंबर, १९९९ पासून अंमलात आलेली आहे, आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-१२०१/२७४/प्र.क्र.२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ अन्वये मंजुर झाली असुन, ती दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आलेली आहे.

आणि, ज्याअर्थी उक्त विकास येाजनेमध्ये मौजे-दिवा येथील स.नं. २४१(पै.), क्षेत्र सुमारे ३३००.०० चौ.मी. "आ.क्र. २-प्राथमिक शाळेच्या विस्तारासाठी" या करिता मौजे- दिवा येथील स.नं. २२२ (पै.), २४ (पै.) व २७(पै.), क्षेत्र सुमारे २७६१.०० चौ.मी., "आ.क्र. १-पार्किंग" या करिता आरक्षित असून प्रस्तावित २०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता व रहिवास विभाग आहे.

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूची-एक मध्ये नमूद केलेल्या जमिनी (यापुढे " उक्त जमिनी " म्हणून संबोधिलेल्या) सोबतच्या अनुसूची-दोन मध्ये नमूद केलेल्या " मौजे-दिवा येथील २० मीटर रुंद (दिवा रेल्वे स्टेशन ते ठा.म.पा. च्या शाळेपर्यंत) रस्ता " या सार्वजनिक प्रयोजनाकरीता संपादित होत आहे. (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेल्या);

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेने (यापुढे " उक्त महानगरपालिका " म्हणून संबोधिलेल्या) उक्त नगररचना अधिनियम, १९६६ नुसार नियोजन प्राधिकरण म्हणून उक्त नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ चे पोट-कलम (४) अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पत्र क्र.उजि/भूसं(समन्वय)/टे-१/दिवा रेल्वे स्टेशन ते ठा.म.पा./बारकोड नं. L१६८६८१३००३६८६४०/कावि-११३६/२०२३, जा. क्र. ७०९, दिनांक ६ जुलै २०२३ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे.

Pt IKDS Ex. No. 14 (17-2-2026).indd 1 2/20/2026 2:04:24 AM

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१ पोट-कलम (१) अन्वयेची अधिसूचना क्र.टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७ दिनांक ३ मार्च १९७९ नुसार उक्त मंजुर सुधारित विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगररचना अधिनियमाच्या कलम १२६ पोट-कलम (१), (२) व (४) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, संपादनाखालील क्षेत्र मंजुर विकास योजनेतील रस्त्याच्या आखणीनुसार संपादित होत असल्याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी तसेच रस्त्याच्या आखणी व संपादनाअंतर्गत जागेच्या हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठाणे महानगरपालिकेची आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ चे कलम ५(१) अन्वये दाखल मजकुर व ५(२) अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे " उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३" म्हणून संबोधलेल्या) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीं सह) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेले कार्यपद्धती, अशा जमिनींच्या संबंधात लागु होणार नाही. तसेच महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील जा.क्र.टिपीएस-१८१९/१७९६/ प्र.क्र.२१८/१८/नवि-१३ दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२५ ते १२६ मधील तरतुद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११(१), कलम १६ व १८ यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच याअनुषंगिक कलमे लागु होणार नाहीत ", अशा सुचना दिल्या आहेत ; आणि म्हणून यासोबतच्या अनुसूची-तीन मधील पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन व अनुसूची- चार मधील पुनर्वसन व पुनर्स्थापना योजनेचा सारांश या अनुसूची लागु होत नाही.

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोन मध्ये तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या " मौजे-दिवा येथील २० मीटर रुंद (दिवा रेल्वे स्टेशन ते ठा.म.पा. च्या शाळेपर्यंत)" रस्ता या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यकता आहे अशी खात्री झाली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसारची नुकसानभरपाई संपुर्णतः रक्कम व तद्अनुषंगिक भूसंपादनाच्या खर्चाची रक्कम संपूर्णपणे उक्त ठाणे महानगरपालिकेने अदा करावयाची आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१ चे पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना क्र. टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७ दि.०३ मार्च, १९७९ नुसार शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह उक्त भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये तपशिलवार वर्णन केलेल्या उक्त जमिनी अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ३G अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्याकरिता उपविभागीय अधिकारी, ठाणे उपविभाग, ठाणे, २१७, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१ (यापुढे " भूसंपादन अधिकारी " म्हणून संबोधिलेल्या) यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नाव मौजे दिवा, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे

अ. क्र.	स.नं./हि.नं.	संपादित खाजगी क्षेत्र (चौ.मी.)
१	२४/ब पै	३३.९४
२	२४/ब पै	३५६.१
३	२४/क	१३.५
४	२४/क	९.९६
५	२४/क	१५.८८
६	२४/क	५.५६
७	२४/क	५४.११
८	२४/५/अ	२८३.३४
९	२४/५/अ	६५.१
१०	२४/७/अ	२०.००
११	२४/९/अ	३.५३
१२	२७/अ/८	३०.००
१३	२७/१/७/अ	१८५.६७
१४	२७/१/१०/अ	९.१
१५	२७/ब	५२०.४
१६	२७/क	६.५
१७	२७/क	२४०.८४
१८	२७/क	३.७४
१९	२७/क	२०.६४
२०	२७/क	१.३८
२१	२७/क	०.४२
२२	२७/क	६.४९
२३	२७/क	१३.७१
२४	२७/क	१८.४०
२५	२७/क	१८.४०
२६	२७/क	१६.२०
२७	२२२/१/अ	१२१६.००
२८	२२२/१/अ/१	
२९	२२२/१/ब	
एकूण क्षेत्र		**३१६८.९१**

अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	ठाणे शहराचे मंजूर विकास आराखड्यातील सेक्टर क्र. १० मधील मौजे-दिवा येथील स.नं.२४/४अ, २४/५/अ, २४/६/अ २४/७/अ, २४/क, २७/४/अ, २७/१/५/अ, २७/६/अ, २७/१/७/अ, २७/अ/८, २७/१/१०/अ, २७/१/अ/१०/क, २७ब, २२२/१/अ, २२२/१/अ/१, २२२/१/ब, २२२/२, २४१/१/अ, २४१/१/ब, २४१/३, २४१/४, २४१/५ या भुखंडावरील २० मीटर रुंद(दिवा रेल्वे स्टेशन ते ठा.म.पा. च्या शाळेपर्यंत) रस्त्याकरिता आवश्यक जमिनीचे भूसंपादन करणे.
प्रकल्पाच्या कामाचे वर्णन	मौजे-दिवा येथील स.नं. २४/ब/पै, २४/क/पै, २४/५/अ/पै, २४/७/अ, २४/९/अ, २७/अ/८, २७/१/७/अ, २७/१/१०/अ, २७/ब, २७/क/पै, २२२/१/अ, २२२/१/अ/१, २२२/१/ब या भुखंडावरील २० मीटर रुंद (दिवा रेल्वे स्टेशन ते ठा. म. पा. च्या शाळेपर्यंत) रस्त्याकरिता आवश्यक जमिनीचे भूसंपादन करणे.
समाजाला होणारा लाभ	रस्ता वाहतुक.
प्रकल्पाखालील जागेची सद्यस्थिती	सद्यस्थितीत संपादनाखालील क्षेत्र खुले / मोकळे आहे.

अनूसूची – तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन-लागु नाही

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने जा.क्र.टीपीएस.१८१९/१७९६/ प्र.क्र.२९८/१८/नवि-१३ दि.०८/०३/२०१९ अन्वये " उक्त नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२५ ते १२६ मधील तरतुद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११(१), कलम १६ व १८ यासोबतच परिशिष्ट-२ व ३ तसेच याअनुषंगिक कलमे लागु होणार नाहीत " अशा सूचना दिल्या आहेत.

अनुसूची- चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश- लागु नाही.

टीप.– उक्त जमिनीचा नकाशा निरीक्षण, उपविभागीय अधिकारी, ठाणे उपविभाग, ठाणे, २१७, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१ या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

उर्मिला पाटील,
उपविभागीय अधिकारी,
ठाणे उप विभाग, ठाणे.

स्थळ ठाणे,
दिनांक १३ फेब्रुवारी २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Pt IKDS Ex. No. 14 (17-2-2026).indd 4 2/20/2026 2:04:24 AM